**ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००**
**च्या अंमलबजावणीबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग
क्रमांक. ध्वनीप्र २००९/प्र.क्र.१२/०८/तां.क. १
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ५ सप्टेंबर, २०१६.

**वाचा** :- १) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रलयाची अधिसूचना क्र. एसओ १२३(ई), दि. १४.२.२००८.
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६.८.२०००.
3) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.६.२००१.
४) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रलयाची अधिसूचना क्र. एसओ १००८(ई), दि. ११.१०.२००२
५) शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र २०००/प्र.क्र.२४/तां.क.२(भाग-३) दिनांक ७.३.२००३.
६) शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र २००८/प्र.क्र.१३/०८/तां.क.१, दिनांक २८.४.२००८.
७) शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र २००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१ दिनांक ३१.७.२०१३.
८) माननीय उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १७३/२०१० दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेले आदेश / निकालपत्र.

**प्रस्तावना** :- केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५(२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी (रात्री १० वा. पासून सकाळी ६ वाजेपर्यंत) करता येत नाही. या नियमामध्ये दि.११.१०.२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम (३) चा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. त्यान्वये ध्वनी प्रदूषपणाची पातळी विहित मर्यादेत राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक सणांकरिता करता येऊ शकेल. तथापि वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. तसेच या अनुषंगाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये मा.उच्च न्यायलयाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००च्या नियम ५ (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी खालीलप्रमाणे १५ दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत करता येईल :-

| | | |
|---|---|---|
| शिवजयंती | : | १ दिवस |
| ईद-ए-मिलाद | : | १ दिवस |
| डॉ. आंबेडकर जयंती | : | १ दिवस |
| १ मे, महाराष्ट्र दिन | : | १ दिवस |
| गणपती उत्सव | : | ४ दिवस ( दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरी विसर्जन व अनंत चर्तुदशी) |
| नवरात्री उत्सव | : | २ दिवस (अष्टमी व नवमी) |
| दिवाळी | : | १ दिवस (लक्ष्मीपूजन) |
| ख्रिसमस | : | १ दिवस |
| ३१ डिसेंबर | : | १ दिवस |
| उर्वरीत २ दिवस | : | परवानगी राज्य शासनाच्या मान्यतेने महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक्तेनूसार दिली जाईल. |

राज्यात वरीलप्रमाणे ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याबाबतची सूट १५ दिवसांपेक्षा जास्त होणार नाही व ही सूट शांतता क्षेत्रात लागू नसल्याने त्याची अमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील. अशा प्रकाराची परवानगी देतांना ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे. ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर मा. उच्च न्यायालयाने दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पध्दतीने कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल राज्य शासनास पाठवावा.

तसेच प्राधिकरणाने निदर्शास आणून दिलेल्या बांबीवर सबंधित जिल्हाधिकारी किंवा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९(अ) नुसार कार्यवाही करावी.

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित महानगरपालिका यांनी एकत्रित रित्या समन्वय साधून महानगरपालिका क्षेत्रांसाठी ध्वनी मॅपींग करुन असे नकाशे सर्व संबंधीत प्राधिकरणांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

संबंधीत सर्व जिल्हाधिकारी ,ध्वनी प्राधिकरण व महानगरपालिका आयुक्त यांनी मा. उच्च न्यायालयाच्या दि. १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाचे तंतोतन पालन करुन मासिक अहवाल राज्य शासनास सादर करावा.

या शासन निर्णयान्वये, पर्यावरण विभागाने यापूर्वी दि. ३१ जुलै, २०१३ रोजी या विषयी निर्गमित केलेला शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तत्काळ लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

5/09/2016

(डॉ. बी.एन. पाटील)
संचालक (पर्यावरण)

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री व राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव
अपर मुख्य सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग
सचिव, नगर विकास विभाग
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
सर्व पोलीस आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद

सर्व मुख्यधिकारी, नगरपालिका
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीसाठी)
संचालक, मुंबई दूरदर्शन (प्रसिध्दीसाठी)
संचालक, आकाशवाणी, मुंबई (प्रसिध्दीसाठी)